# नागपूर विभागातील गैर प्राथमिक क्षेत्राचा वाढता विस्तार व शहरीकरण

डॉ. जयंतकुमार एम. मस्के, अर्थशास्त्र विभाग प्रमुख, एस. एन. मोर महाविद्यालय, तुमसर.
(E-mail : jayantmaskey17@gmail.com, Mob. No. : 9421803327)

**सारांश :**नागपूर विभागात नागपूर जिल्हा उच्च शहरीकरण गटात, चंद्रपूर व वर्धा जिल्हा मध्यम शहरीकरण गटात आणि भंडारा, गोंदिया गडचिरोली जिल्हा अल्प शहरीकरण गटात येतात. त्यापैकी कमी शहरीकरण असलेल्या भंडारा, गोंदिया, गडचिलोरी जिल्हयातील अनेक वस्तीस्थानांचा शहर म्हणून विकास झालेला नाही. कारण या जिल्हयात जास्तीत जास्त लोकसंख्या प्राथमिक व्यवसायात गुंतलेली असून तेथे गैर प्राथमिक व्यवसायाचा विकास फारसा झालेला नाही.

**प्रस्तावना :**लोकसंख्या शास्त्रानुसार एखाद्या प्रदेशाच्या एकूण लोकसंख्येमध्ये शहरात राहणा-या लोकांचे प्रमाण म्हणजे शहरीकरण होय. अधिकाधिक संख्येने लोक शहरांत राहू लागले की शहरीकरण वाढत जाते. शहरीकरणातील वाढ देशाचा विकास दाखविते. देशाचा आर्थिक विकास मोजण्याचे जे अनेक मापदंड आहेत. त्यांत शहरीकरण हा एक आहे. कारण शहरीकरणाचा अर्थ लोक प्राथमिक व्यवसायातून बाहेर पडून इतर विशेषतः तृतीयक व चतुर्थक व्यवसायांकडे वळू लागले आहेत असा होतो. या व्यवसायात प्रामुख्याने व्यापार, दळणवळण व निरनिराळया प्रकारच्या सामाजिक व प्रशासकीय सेवा येतात. शहरे या आर्थिक व इतर सेवा पुरविणारी केंद्रे असतात. आजूबाजूच्या सर्व वस्त्यांना ही केंद्रे सेवा पुरवितात. या सेवांसाठी जशी मागणी वाढत जाईल तशी ही केंद्रे वाढत जातात. म्हणजे शहरीकरणाचा विकास होतो. या केंद्राची वाढ किंवा शहरीकरणाचा विकास एकूण आर्थिक क्रियांच्या विकासाचा व लोकांचे जीवनमान उंचावण्याचा निदर्शक आहे. म्हणून वर्तमान काळात शहरीकरणाला मानवी-जीवनातील एक आवश्यक अंग, समाजामध्ये शहरीकरणाला मानवी जीवनाचा एक आवश्यक घटक, सहयोगी पर्याय तसेच क्षेत्राच्या उन्नतीचा व संपन्नतेचा एक महत्वपूर्ण निर्देशक मानण्यात येऊ लागले आहे.आर्थिक विकासात शहरीकरण अभिप्रेत असते. ज्या विशिष्ट ठिकाणी रोजगाराच्या संधी शैक्षणिक सोयी, आरोग्य सोयी, करमणूकीच्या सुविधा, जास्त आर्थिक सुविधा इ. अनुकूल असतात अशा ठिकाणी स्थलांतराची प्रवृत्ती दिसून येते. सामान्यतः असे दिसून येते की, एखाद्या क्षेत्राचा जसजसा आर्थिक विकास होत जातो. तसतसा त्या क्षेत्राच्या शहरी भागात लोकसंख्येचा अनुपात वाढत जातो. थोडक्यात आर्थिक विकास हा लोकसंख्येच्या शहरीकरणाला चालना देणारा असतो. शहरीकरणाबरोबर अंतर्गत व बर्हिगत बचतीमध्ये वाढ होते त्यामुळे रोजगार, उत्पादन, आधुनिक तंत्रज्ञान, दळणवळण, वाहतूक आणि विविध पायाभूत सुविधा व गुंतवणूकीमध्ये वाढ होऊन बाजारपेठेचा पर्यायाने शहराचा विकास होतो. यावरून शहरीकरण जसे पसरत जाईल तसा आर्थिक विकासही वाढत जाईल म्हणून शहरीकरण हे आर्थिक विकासाचे परिणाम असते. तसेच आर्थिक विकासाचे कारणही असू शकते.

देशाची लोकसंख्या भिन्न व्यवसायात किती प्रमाणात विभागली आहे. तसेच भिन्न व्यवसायापासून मिळणा-या एकूण उत्पन्नाचे प्रमाण किती आहे हे विचारात घेतल्यास त्या देशाच्या अर्थव्यवस्थेच्या स्वरूपांची व विकासाच्या पातळीची कल्पना येते. व्यवसायिक विभागणीच्या दृष्टीने व्यवसायांचे प्राथमिक क्षेत्र, द्वितीयक क्षेत्र व तृतीयक क्षेत्र असे तीन गटात वर्गीकरण केले जाते. प्राथमिक क्षेत्रात शेती, वन, पशुपालन, मासेमारी इत्यादी व्यवसायांचा समावेश केला जातो. द्वितीय क्षेत्रामध्ये लहान व मोठे उद्योगधंदे, खाणकाम, बांधकाम इत्यादी व्यवसायांचा समावेश केला जातो. तर वाहतूक, दळणवळण, व्यापार, अधिकोषण, सरकारी व गैरसरकारी या सर्व सेवांचा समावेश तृतीय क्षेत्रात होतो. शहरीकरणाचा अर्थ लोक प्राथमिक व्यवसायातून बाहेर पडून इतर विशेषतः द्वितीयक व तृतीयक व्यवसायाकडे वळू लागले आहेत असा होतो. प्राथमिक क्षेत्रात गुंतलेल्या कार्यशील लोकसंख्येचे प्रमाण उत्तरोत्तर कमी होत जाऊन द्वितीयक व तृतीयक क्षेत्रात गुंतलेल्या लोकसंख्येचे प्रमाण वाढू लागते. अशा द्वितीयक व तृतीयक क्षेत्रात गुंतलेल्या लोकसंख्येचे प्रमाण वाढत जाणे हे आर्थिक विकासाचे लक्षण असते. अशाप्रकारे वाढत्या गैर प्राथमिक क्षेत्राच्या विस्ताराबरोबर आर्थिक विकासाचे व शहरीकरणाचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येते.

प्राथमिक क्षेत्राच्या तुलनेत उद्योग, व्यापार, वाहतूक, दळणवळण, व्यवसाय व निरनिराळया प्रकारच्या सेवा अशा विभिन्न क्षेत्राचा जिथे तेजीने विकास व विस्तार घडून येतो. तिथे शहरीकरणाची गतीपण तीव्र राहते. पाश्चात्य देश याचे प्रमाण आहेत. युरोपात औद्योगिक क्रांती नंतर तीव्र शहरीकरण घडून आले. संयुक्त राज्य अमेरीकेत शहरीकरण व औद्योगिकरणाची प्रक्रीया सोबत घडून आली. भारत व चीन तीव्र लोकसंख्या वृद्धी असूनही प्राथमिक कार्यावर आधारीत अर्थव्यवस्थेच्या कारणामुळे शहरीकरणात मागे आहे. यावरून गैर प्राथमिक क्षेत्राच्या विकासाबरोबर शहरीकरणाचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येते.

२०११ च्या जनगणना अहवालानुसार भारताचे व महाराष्ट्र राज्याचे शहरीकरण अनुक्रमे ३१.१६ टक्के व ४५.०२ टक्के झाले आहे. नागपूर विभागाचे शहरीकरण ४२.१४ टक्के झालेले असून नागपूर विभागात एक तृतीयांश पेक्षा अधिक लोकसंख्या शहरी भागात राहते. नागपूर विभागाचे शहरीकरण कोकण विभागापेक्षा कमी असून पुणे विभागाच्या बरोबरीला व नाशिक, अमरावती, औरंगाबाद विभागापेक्षा अधिक आहे. नागपूर विभागात सर्वात जास्त शहरीकरणाचे प्रमाण नागपूर जिल्हयाचे असून या जिल्हयात ६८.३० टक्के लोक शहरात राहतात. तर गडचिरोली जिल्हयातील शहरीकरण सर्वात कमी म्हणजे ११.०० टक्के झालेले आहे. तसेच वर्धा, चंद्रपूर, भंडारा व गोंदिया जिल्हयात शहरीकरणाचे प्रमाण अनुक्रमे ३२.४७, ३५.०८, १६.५० व १७.०७ आहे. महाराष्ट्र व नागपूर विभागाच्या तत्सम प्रमाणापेक्षा नागपूर जिल्हयातील शहरीकरण अधिक आहे. तर विभागातील इतर जिल्हयांचे शहरीकरण कमी आहे. नागपूर विभागाच्या जिल्हयावार शहरीकरणाच्या विविध पातळयाबरोबर विकासाच्या विविध पातळया आढळतात.ज्या प्रदेशात गैर प्राथमिक क्षेत्राचा (द्वितीयक व तृतीयक क्षेत्राचा) विस्तार जास्त घडून आलेला आहे. त्या भागात शहरीकरणाची प्रवृत्ती विशेष कार्यान्वीत झालेली दिसते. गैर प्राथमिक क्षेत्र व शहरीकरण यातील संबंध तपासून पाहण्यासाठी जिल्हयाच्या निव्वळ उत्पन्नाचे क्षेत्रनिहाय प्रमाण हा निकष वापरण्यात आला आहे. या निकषानुसार ज्या जिल्हयाच्या एकूण उत्पन्नामध्ये प्राथमिक क्षेत्राच्या उत्पन्नाचा वाटा उत्तरोत्तर घटत असेल आणि द्वितीयक व तृतीयक

क्षेत्राच्या उत्पन्नाचा वाटा उत्तरोत्तर वाढत असेल (गैर प्राथमिक क्षेत्राचा विस्तार होत असेल) तर अशा जिल्हयाची शहरीकरण प्रवृत्ती वाढेल.

**चालू किंमतीनुसार क्षेत्रवार निव्वळ जिल्हा/राज्य उत्पन्न** (रूपये लाखात)

| जिल्हा/ राज्य | प्राथमिक क्षेत्र | | द्वितीय क्षेत्र | | तृतीय क्षेत्र | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०००-०१ | २००७-०८ | २०००-०१ | २००७-०८ | २०००-०१ | २००७-०८ |
| भंडारा | ६४,०१८ (३३.३३) | १,२८,५०४ (२८.५५) | ३५,७१२ (१८.६०) | ६२,२६० (२०.४६) | ६२,३१५ (४८.०७) | २,२६,४०१ (५०.६६) |
| गोंदिया | ६०,५५८ (३१.५७) | ८१,६०५ (१६.८७) | ४१,७२६ (२१.७५) | ८४,७३२ (२०.६३) | ८६,५५४ (४६.६८) | २.४४.३६७ (५६.५०) |
| नागपूर | १,४६,५६८ (१५.४३) | ३,१०,५६४ (१३.५४) | २,३६,५६५ (२४.४०) | ६,२६,६२३ (२७.३४) | ५,८३,३७४ (६०.१७) | १३,५५,५०२ (५६.१५) |
| वर्धा | ६४,२४६ (३०.०१) | १,३६,१८६ (२८.१६) | ३३,८६७ (१५.८४) | ८०,६३१ (१६.३१) | १,१५,८६६ (५४.१५) | २,७४,४४८ (५५.५३) |
| चंद्रपूर | १,५३,६६८ (३६.७३) | २,५६,८६६ (२६.७६) | ७१,१७७ (१७.०१) | १,५७,८०४ (१८.०६) | १,६३,५५२ (४६.२६) | ४,५४,६५४ (५२.१२) |
| गडचिरोली | ५०,४८७ (४१.६०) | ६५,५२० (३७.६१) | ११,६२८ (६.८३) | २५,१३७ (६.६८) | ५८,६५३ (४८.५७) | १,३१,२६८ (५२.११) |
| नागपूर विभाग | ५,४२,५४८ (२५.७५) | १०,१५,२७८ (२१.२७) | ४,३१,०३८ (२०.४६) | १०,६७,४८७ (२२.३७) | ११,३३,६४४ (५३.७६) | २६,८६,६७० (५६.३६) |
| महाराष्ट्र राज्य | ३८,२६,५६८ (१७.४७) | ८०,०६,६२८ (१५.८६) | ५३६६६८० (२४.५०) | १२३१७३४८ (२४.३६) | १२७१०५७८ (५८.०३) | ३०१७०७६२ (५६.७५) |

**आधार : १) महाराष्ट्र राज्य सांख्यिकीय गोषवारा २००७-०८ २) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०१० भंडारा, गोंदिया, नागपूर, वर्धा, चंद्रपूर व गडचिरोली जिल्हा.**

वरील तक्त्यावरून दिसून येते की नागपूर विभागाच्या निव्वळ उत्पन्नात प्राथमिक क्षेत्राकडून घातल्या जाणा-या भरीचे प्रमाण सन २०००-०१ मध्ये २५.७५ टक्के होते. ते सन २००७-०८ मध्ये २१.२७ टक्केपर्यंत घटले तसेच सन २०००-०१ मध्ये जिल्हयाच्या निव्वळ उत्पन्नात द्वितीय क्षेत्राचा वाटा २०.४६ टक्के व तृतीय क्षेत्राचा वाटा ५३.७६ टक्के होता. त्यात वाढ होऊन सन २००७-०८ मध्ये द्वितीय क्षेत्राचा वाटा २२.३७ टक्के व तृतीय क्षेत्राचा वाटा ५६.३६ टक्के झाला. यालाच अर्थ नागपूर विभागात प्राथमिक क्षेत्राचे महत्व सापेक्षतेने पूर्वीच्या मानाने कमी होत आहे व गैर प्राथमिक क्षेत्राचा म्हणजेच औद्योगिक व सेवा क्षेत्रांचा विकास होत आहे. तसेच या दहा वर्षाच्या कालावधीत (२००१ ते २०११ च्या जनगणनेनुसार) नागपूर विभागाचे शहरीकरण जवळपास ५ टक्क्यांनी वाढले आहे. थोडक्यात गैर प्राथमिक क्षेत्राच्या विकासाबरोबर नागपूर विभागातील शहरीकरण वाढत आहे. मात्र नागपूर विभागातील गैर प्राथमिक क्षेत्राचा विकास महाराष्ट्राच्या तुलनेत कमी आहे. सन २००७-०८ मध्ये महाराष्ट्र राज्यात द्वितीय व तृतीय क्षेत्राचा राज्य उत्पन्नातील वाटा अनुक्रमे २४.३६ व ५६.७५ टक्के असतांना नागपूर विभागाचा द्वितीय व तृतीय क्षेत्राचा विभागाच्या एकूण उत्पन्नातील वाटा अनुक्रमे २२.३७ व ५६.३६ टक्के आहे. तसेच महाराष्ट्र राज्यात प्राथमिक क्षेत्राचा राज्य उत्पन्नातील वाटा १५.८६ टक्के असतांना नागपूर विभागाचा प्राथमिक क्षेत्रातील विभागाच्या एकूण उत्पन्नातील वाटा २१.२७ टक्के पर्यंत अधिक आहे. एखाद्या देशाची अर्थव्यवस्था जेवढी मागासलेली तेवढी त्या देशाच्या निव्वळ राष्ट्रीय उत्पन्नात प्राथमिक क्षेत्राची विशेषतः शेतीक्षेत्राकडून घातली जाणारी भर अधिक असते. नागपूर विभागाची ही भर महाराष्ट्राच्या तुलनेत अधिक आहे. यावरून नागपूर विभाग महाराष्ट्राच्या तुलनेत मागासलेला आहे. थोडक्यात महाराष्ट्राच्या तुलनेत प्राथमिक क्षेत्रातील मागासलेपणा शिवाय गैर प्राथमिक क्षेत्राचा विकासही कमी असल्यामुळे नागपूर विभागातील शहरीकरणाचे प्रमाण महाराष्ट्राच्या तत्सम प्रमाणापेक्षा कमी आहे.

सन २००७-०८ मध्ये महाराष्ट्राच्या निव्वळ उत्पन्नात प्राथमिक क्षेत्राचा वाटा १५.८६ टक्के असतांना नागपूर विभागाच्या भंडारा, गोंदिया, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली या जिल्हयाच्या निव्वळ उत्पन्नात प्राथमिक क्षेत्राचा वाटा अनुक्रमे २८.५५, १६.८७, २८.१६, २६.७६ व ३७.६१ टक्के आहे. महाराष्ट्राच्या तत्सम प्रमाणाशी तुलना करता या जिल्हयात प्राथमिक क्षेत्राची विशेषतः शेती क्षेत्राकडून घातली जाणारी भर अधिक आहे. कारण या जिल्हयात जास्तीत जास्त लोकसंख्या ही कृषी व्यवसायात गुंतलेली असून या ठिकाणी बिगर-कृषी व्यवसायाचा विकास फारसा झालेला नाही. या जिल्हयाच्या निव्वळ उत्पन्नात द्वितीय व तृतीय क्षेत्राचा वाटा हा महाराष्ट्र राज्याच्या तुलनेत कमी आहे. यावरून या जिल्हयांमध्ये उद्योगांचा तसेच सेवा क्षेत्राचा विकास फारसा झालेला नाही. परिणामतः गैर प्राथमिक क्षेत्राचा विकास कमी असल्यामुळे या जिल्हयांमध्ये महाराष्ट्राच्या तुलनेत शहरीकरणाची प्रवृत्ती कमी आहे. याच वर्षात नागपूर जिल्हयाच्या निव्वळ उत्पन्नात प्राथमिक क्षेत्राचा वाटा १३.५४ टक्के आहे. द्वितीय व तृतीय क्षेत्राचा वाटा अनुक्रमे २७.३४ व ५९.१५ टक्के आहे. महाराष्ट्राच्या तत्सम आकडेवारीशी तुलना करता नागपूर जिल्हयात प्राथमिक क्षेत्रापासून मिळणा-या उत्पन्नाचे प्रमाण कमी आहे आणि द्वितीय क्षेत्रापासून मिळणा-या उत्पन्नाचे प्रमाण अधिक आहे. तसेच तृतीय क्षेत्रापासून मिळणा-या उत्पन्नाचे प्रमाण जवळपास महाराष्ट्र राज्याच्या बरोबर आहे. यावरून नागपूर जिल्हयाचा महाराष्ट्र राज्याच्या तुलनेत गैर प्राथमिक क्षेत्राचा विकास अधिक आहे. म्हणून या जिल्हयातील शहरीकरणाची प्रवृत्ती महाराष्ट्र राज्याच्या तुलनेत अधिक आहे.

**निष्कर्ष :**नागपूर विभागात २००१ मध्ये ३७.३४ टक्के लोक शहरात राहत होते. हे प्रमाण वाढत जाऊन २०११ मध्ये ४२.१७ टक्के झाले. तसेच नागपूर विभागातील शहरांच्या संख्येचा विचार करता २००१ मध्ये नागपूर विभागात ६० शहरे होती त्यात वाढ होऊन २०११ मध्ये

१०५ झाली. नागपूर विभागातील शहरीकरणाच्या वाढीवर सर्वात जास्त प्रभाव नागपूर जिल्हयाचा आहे कारण नागपूर जिल्हयात नागपूर एक महानगर आहे. नागपूर विभागाच्या एकूण शहरी लोकसंख्येत नागपूर शहराचा वाटा जवळजवळ अर्धा आहे. म्हणून नागपूर विभागातील शहरीकरणाची प्रवृत्ती नागपूर शहराभोवती केंद्रीत स्वरूपाची आढळते.

महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१०-११ नुसार नागपूर विभागाच्या स्थूल उत्पन्नात वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली जिल्हयाचा वाटा अनुक्रमे ६.४०, ५२.४८, ७.६३, ७.२५, १७.६८ व ४.६६ टक्के आहे. विभागाच्या एकुण उत्पन्नात ५०.०० टक्के पेक्षा जास्त वाटा एकटया नागपूर जिल्हयाचा आहे तर इतर जिल्हयांचा वाटा ५०.०० टक्केपेक्षा कमी आहे. यावरून नागपूर विभागामध्ये नागपूर जिल्हयाचा आर्थिक-सामाजिक विकास जास्त झाला आहे. या जिल्हयामध्ये औद्योगिक, व्यावसायिक, शैक्षणिक, आरोग्य विषयक व पायाभूत सुविधांचा विकास अधिक झाला आहे. एकूणच गैर प्राथमिक क्षेत्राचा विकास व विस्तार जास्त झाल्यामुळे या जिल्हयातील शहरीकरणाचे प्रमाण अधिक आहे. तसेच विभागामध्ये चंद्रपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया व गडचिरोली जिल्हयांचा आर्थिक-सामाजिक विकास कमी आहे. या जिल्हयामध्ये फारसे औद्योगिकरण झालेले नाही त्यामुळे दारिद्रयाचे, बेकारीचे प्रमाण जास्त आहे. पर्यायाने दरडोई उत्पन्न सुद्धा कमी आहे. त्यामुळे राहणीमान खालावलेले आहे. शैक्षणिक, आरोग्य विषयक व पायाभूत सुविधांचा विकास कमी झाला आहे. त्यामुळे या जिल्हयातील गैर प्राथमिक क्षेत्राचा विकास व विस्तार कमी असल्यामूळे या जिल्हयातील शहरीकरणाचे प्रमाण कमी आहे. नागपूर विभागातील जिल्हयांचे शहरीकरण घडवून आणण्यासाठी या ठिकाणी गैर प्राथमिक क्षेत्राचा विकास व विस्तार होणे आवश्यक आहे. त्यासाठी शहरांचे नियोजनबद्ध पद्धतीने शहरीकरण वाढविण्याकरीता प्रभावी उपाययोजना अंमलात आणण्याची आवश्यकता आहे. यासाठी उद्योग, व्यापार, व्यवसाय, वाहतूक, दळणवळण व विविध प्रकारच्या सेवा अशा विभिन्न क्षेत्राचा विकास होणे आवश्यक आहे.

**संदर्भ :**


1) राव बी. पी.; शर्मा नन्देश्वर (२००६) : ''नगरीय भूगोल'', वसुन्धरा प्रकाशन, गोरखपुर.
2) देसाई स. श्री. मु.; भालेराव, निर्मल (२००६) : ''भारतीय अर्थव्यवस्था'', निराली प्रकाशन, बुधवार पेठ, पुणे.
3) वैद्य ए. बी. (२००३) : ''विदर्भाची अर्थव्यवस्था'', श्री मंगेश प्रकाशन, रामदासपेठ, नागपूर.
4) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी (२०११-१२), अर्थ व सांख्यिकी संचलनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.
5) घारपुरे विठ्ठल (१९९९) : ''लोकसंख्या भूगोल'', पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.
6) दास्ताने संतोष (२००५) : ''महाराष्ट्र २००६'', दास्ताने रामचंद्र आणि कं. पुणे.
7) जाधव तुकाराम (२०११) : ''वार्षिकी २०११ महाराष्ट्र'', द युनिक ॲकॅडमी, पुणे.
8) दर्शनकार अर्जुनराव (१९९९) : ''पंचायतराज व नागरी प्रशासन'', कैलाश पब्लिकेशन्स्, औरंगपुरा, औरंगाबाद